# श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणित)

## पशुगोवंश विभाग

**भारतीय वंशाच्या गायीचे महत्व**

**भारतीय वंशाची गाय व विदेशी गाय या मधील फरक**

भारतवर्षामध्ये प्राचीन काळापासून गायीला संस्कृतमध्ये 'गौ' तर मराठीमध्ये 'गाय' म्हटले जाते. इंग्रज लोक विदेशामध्ये त्यांच्याकडे असणाऱ्या दुध देणाऱ्या प्राण्यास (काऊ) (Cow) म्हणत. भारतामध्ये आल्यावर त्यांना त्यांच्या 'काऊ' (Cow) सारखी दिसणारी भारतीय गाय आढळली. म्हणून त्यांनी भारतीय गाईला 'काऊ' हे इंग्रजी नाव दिले. यामुळे सर्वसामान्यांचा वैचारिक गोंधळ होऊन विदेशी प्राणी 'काऊ' व भारतीय गाय हे दोन्ही एकच असल्याचा गैरसमज निर्माण झाला. म्हणून तर सध्या आपण मुलांना लहानपानापासून गायीला इंग्रजीमध्ये 'काऊ' म्हणतात, असे शिकवतो. तथापि त्यांच्यामध्ये फार मोठा फरक आहे !

विदेशी गाय हि गाय नसून गायीसारखा दिसणारा युरोपमध्ये आढळणारा दुध देणारा प्राणी आहे. होल्स्टेन फ्रीजीयन या विदेशी गायींच्या जाती आहेत. त्यांचे शास्त्रीय नाव बॉस टॉरस (Bos Taurus) हे आहे. कोणत्याही प्राणी व वनस्पती यांचे शास्त्रीय नाव हे जीनस व स्पेसीज यांनी मिळवून बनते.

१. **बॉस टॉरस Bos Taurus** : विदेशी वंशाची गाय (या मध्ये जर्सी, होल्स्टेन फ्रीजीयन या जाती आहेत. या दिसायला अवाढव्य असतात. पाठीला खांदा (वशिंड) नसतो व शिंगे नसतात. शरीराला उग्र वास असतो.

**२. बॉस गॉरस Bos Gaurus (गवा)**

**३. बॉस फ्रंटलिस Bos Frantlis (मिथून)**

**४. बॉस म्युटस Bos Mutus (याक)**

**५. बॉस जवानिकस Bos Javanicus (बेनटेंग)**

**६. बॉस इंडीकस Bos Indicus (भारतीय वंशाची गाय)**

(यामध्ये गीर, खिलार, देवनी, डांगी, थारपारकर, साहीवाल, कांकरेज, गवळाऊ, लालसिंधी इ. २३ जाती आहेत. या दिसायला अटोपशीर, प्रेमळ असतात. पाठीला खांदा (वशिंड) असतो. शिंगे असतात. माता ज्याप्रमाणे मुलांकडे स्नेहाने पाहते, त्याप्रमाणे यांचा चेहरा स्नेहमयी असतो.

या प्राण्यांच्या स्पेसिज वेगळ्या असल्यामुळे त्यांच्या गुणधर्मामध्ये फरक आहे. उदा. वांगे व बटाटे यांच्या शास्त्रीय नावांचे उदाहरण पाहू.

१. वांगे : Solanum Melongena सोलॅनम मेलॉनजेना

२. बटाटे : Solanum Tuberosum सोलॅनम ट्यूबरोसम

या दोन्हींचा जीनस एकाच सोलॅनम असला तरी त्यांची स्पेसिज वेगळी वांगे व बटाटे हे गुणधर्माने वेगळे असतात. हाच नियम विदेशी गाय व भारतीय वंशाच्या गायी यांना लागू असून त्यांच्या स्पेसिज वेगळ्या असल्यामुळे त्यांच्या दुधातील गुणधर्मा मध्ये मुलभूत फरक आहे.

पृथ्वीवरील सर्व सस्तन प्राणी दुध देतात. पण त्या सर्वांचेच दूध मानवी आरोग्यासाठी उपयुक्त नसते. म्हणून भारतीय ऋषीमुनींनी हजारो वर्ष तपश्चर्या (अभ्यास) करून, सर्व प्राण्यांच्या दुधाचा शास्त्रीयदृष्ट्या तुलनात्मक अभ्यास करून भारतीय गायीचे दूध हे आरोग्याला पोषक असल्यामुळे पिण्यास सांगितले आहे. स्त्रीच्या व भारतीय गायीच्या दुधातील तत्वांमध्ये समानता असते. त्यांच्या शरीरातील हार्मोन्सही सारखी असतात. स्त्रीचा व गायीचा गर्भधारणा काळ सारखाच म्हणजे ९ महिने ९ दिवस असतो. इतर प्राण्याचा वेगळा असतो. उदा.म्हैस १० महिने १० दिवस, घोडा ११ महिने ११ दिवस, शेळी ५ महिने ५ दिवस, माकड ५.५ महिने.

**विदेशी वंशाच्या गायीचे दुध आणि भारतीय वंशाच्या गायीचे दुध यामधील फरक : (A1 व A2 दूध)**

विदेशी वंशाच्या गायींच्या दुधातील प्रथिन (Protein) हे **A1** बीटा केसीन प्रकारचे असते म्हणून म्हणून त्यास **A1** दुध असे म्हणतात. या प्रथिनांच्या रासायनिक संरचनेमध्ये ६७ व्या स्थानावर हिस्टीडीन (Histidine) नावाचे मानवी आरोग्यास अत्यंत घातक अमिनो आम्ल असते. भारतीय वंशाच्या गायीच्या दुधातील प्रथिन (Protein) हे **A2** बिटा केसीन या प्रकारचे असते. म्हणून त्यास **A2** दुध असे म्हणतात. या प्रथिनांच्या रासायनिक संरचनेमध्ये ६७व्या स्थानावर प्रोलाईन (Proline) हे मानवी आरोग्यास अतिशय पोषक असे अमिनो आम्ल असते.

**विदेशी वंशाच्या गायीचे दुध (A1 दुध) मानवी आरोग्यास घातक :**

न्यूझीलंडमध्ये अलीकडेच झालेल्या संशोधनानुसार विदेशी वंशाच्या गायीचे दुध पिले असता त्याचे मानवी शरीरात पचन होताना त्यामधून बीसीएम ७ (BCM 7 - Beto Caso Morphine 7) हा अंमली पदार्थाच्या गटातील मानवी शरीरास अत्यंत घातक पदार्थ बाहेर पडतो. त्यामुळे हृदयरोग, मधुमेह टाईप १, ऑटिझम, सिझोफ्रेनिया ई.८० प्रकारचे रोग होत असल्याचे सिद्ध झाले आहे. विदेशी वंशाच्या गायीच्या दुधाची घातकता स्पष्ट करणारा न्यूझीलंड येथील शास्त्रज्ञ प्रो.किथ वुडफोर्ड यांचा 'डेव्हिल इन द मिल्क' (दुधातील सैतान) हा

संशोधन ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. (www.chelseagreen.com) विदेशात विकल्या जाणाऱ्या दूधाच्या पिशव्यांवरही ते दुध भारतीय वंशाच्या गायीचे (**A2**) आहे कि विदेशी वंशाच्या गायीचे (**A1**) आहे, हे स्पष्ट लिहिले जाते.

ब्राझील या देशामध्ये आज रोजी भारतीय वंशाच्या गायी पाळल्या जात आहेत. ब्राझील या देशामध्ये आज रोजी भारतीय वंशाच्या ६० लक्ष गीर गायी उत्तमरीत्या जतन केल्या आहेत. तेथे भारतीय वंशाची गीर गाय एका दिवसाला ६३ लिटर दुध देते, यावरून भारतीय गायी कमी दुध देतात, हा प्रचार खोटा असल्याचे स्पष्ट होते. गरज आहे ती योग्य संगोपन करण्याची ! भारतीय गायींचा पासून मिळणारे शेण व गोमुत्र याबरोबरच धार्मिक, आयुर्वेदिक व अध्यात्मिक फायदा वेगळाच ! भारतीय गायींचे शेणखत जास्त कसदार असते. परदेशात भारतीय वंशाच्या गायींच्या दूधाचे व गोमुत्राचे औषधी महत्व लक्षात घेऊन त्यांच्या वंशाच्या गायींच्या दूधाचे व गोमुत्राचे औषधी महत्व लक्षात घेऊन त्यांच्या संशोधनावर २ हजार कोटींची गुंतवणूक केली आहे ! भारतामध्ये मात्र परदेशी वंशाच्या वळूंबरोबर भारतीय गायींचा संकर (हायब्रीड) करून भारतीय गायींचा शुध्द वंश नष्ट करण्याचा प्रकार वेगाने चालू आहे. त्यामुळे शुध्द भारतीय वंशाची गाय दुर्मिळ होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी, आपल्या भारतीय गायीला भरविण्यासाठी भारतीय वंशाचेच वळू वापरावेत

## II भारतीय गायीचे औषधी महत्व II

आयुर्वेदामध्ये गायीला पृथ्वीवरील सर्वात मोठी वैद्यराज असे म्हटले आहे. भारतीय गायीच्या पाठीच्या मणक्यामध्ये सुर्यकेतू नावाची नदी असते. गायी सुर्यकेतू नदीच्या सहाय्याने सूर्यापासून येणारी किरणे जास्तीत जास्त प्रमाणात शोषून घेतात. त्यामुळे गायीच्या दुध, तूप व गोमुत्रामध्ये सुर्यतत्वाचे प्रमाण सर्वाधिक असते. गायीच्या दुधामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते, बुद्धी तल्लख होते व शरीर चपळ बनते.

भारतीय गायीच्या दुधामध्ये मुबलक प्रमाणात डी३ हे जीवनसत्व आढळते. आयुर्वेदामध्ये पंचगव्य (दूध, दही, तूप, गोमुत्र व गोबर) हे शरीरांच्या सर्व व्याधींवर रामबाण औषध असल्याचे सांगितले आहे. गायीच्या दूध, तूप व गोबर यामध्ये किरणोत्सर शोषणाची क्षमता असते.

## II गायीचे धार्मिक महत्व II

- गायीचा जन्म समुद्रमंथनामधून झाला. गाय ही विश्वाची माता मानली जाते. महादेवाची वाहन नंदी (बैल) असतो. बैल (वृषभ देवता) हे भारतीय संस्कृतीचे मूलाधार असून समृद्धीचे प्रतिक मानले जातात. गायीच्या शरीरामध्ये ३३ कोटी देवता निवास करतात. गाय ११ रुद्रांची आई आहे. ८ वसुंची कन्या आहे. १२ आदित्यांची बहीण आहे. अमृतरूपी दूध देणारी आहे. (ऋग्वेद ८/१०१/५)
- गाय स्वर्गात जाण्याची शिडी आहे. गोसेवेने स्वर्गप्राप्ती होते. गाय स्वर्गात सुद्धा पूजनीय आहे. गाय सर्व मनोकामना पूर्ण करणारी आहे. गायीचे स्थान देवांपेक्षाही वरचे आहे. (महाभारत अनुशासन पर्व ५१/३३)
- जो मनुष्य गायीला हाताचा स्पर्श करून प्रदक्षिणा करतो आणि गायींच्या चरणाखालील धूळ मस्तकी लावतो त्याला पृथ्वी प्रदक्षिणेचे व सर्व तीर्थामध्ये स्नान केल्याचे पुण्य मिळते. (पद्मपुराण सृष्टी ५०/१६५/१६६)
- जेथे गायी राहतात, त्या स्थानाला तीर्थभूमी म्हणतात म्हटले जाते, अशा पुण्यभूमीत ज्या मनुष्याचा मृत्यू होतो तो तत्काळ मुक्त होऊन जातो, हे निश्चित आहे. (ब्रम्ह वैवर्त पुरण २१/९३)
- गायी समाधानकारक वास्तव्य करत असलेल्या भूमीवर चांगली पर्जन्यवृष्टी होते. गाय घरासमोर ठेवली असता संपूर्ण वास्तुदोष दूर होतो.
- जो मनुष्य मनोभावे गायीची सेवा करतो व त्यांना पोटभर सुग्रास खाऊ घालतो त्याच्यावर संतुष्ट होऊन गायी त्याला अत्यंत दुर्लभ असा वर प्रदान करतात. गोसेवेने लक्ष्मी प्रसन्न होते. ((महाभारत अनुशासन पर्व ८१/३३)
- गायीला पशु मानू नये, तुळशीला वृक्ष मानू नये व संतांना मनुष्य मानू नये. तिन्ही भगवंताची रूपे आहेत. (ज्ञानेश्वरी)
- गायीला कसायाच्या हातून सोडविल्यामुळे मनुष्य पूर्वीच्या आणि नंतरच्या सात पिढ्यांचा उद्धार करतो. त्याच्या कुंडलीतील पितृदोष दूर होतो. (महाभारत अनुशासन पर्व)
- ज्याचा घरी गाय त्याच्या घरी विठ्ठलाचे पाय । (संत तुकाराम)
- नियमित पंचगव्य स्नानाने मनातील कुविचार नाहीसे होऊन जन्मजन्मांतरीचे दोष नाहीसे होतात. (प.पु. गुरुमाऊली)

# ॥ गायीसाठी चारा लागवड व नियोजन ॥

वर्षभर चारा पुरवठ्याचे नियोजन करताना चांगल्या उत्पादनाच्या बरोबरीने रसदार हिरवा चारा, प्रथिने आणि पिष्ठमय पदार्थयुक्त चारा जातींची लागवड महत्त्वाची आहे. जनावरांच्या आहारात कडबा आणि आंबवण, ताजा चारा आणि मुरघास यांचा योग्य समतोल राखणे महत्त्वाचे आहे.

एका एकरातून वर्षभरात 45 ते 50 टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते. एका एकरातून तयार होणाऱ्या हिरव्या चाऱ्यावर तीन प्रौढ जनावरे व्यवस्थित पोसली जातील. या जनावरांना एकदल आणि द्विदल असा समतोल चारा मिळण्यासाठी एकदल आणि द्विदल चारा पिकांच्या लागवडीचे नियोजन केल्यास जनावरांना वर्षभर हिरवा सकस चारा मिळेल.

वर्षभराच्या चारापुरवठ्याचे नियोजन करताना चाऱ्याचे सर्वसाधारण उत्पादन जमिनीचे नियोजन करताना हिशेबात धरले जाते. या पद्धतीमुळे चारापुरवठ्यामध्ये अडथळा येतो. कारण अंदाजापेक्षा उत्पादन कमी येते किंवा अंदाजापेक्षा जास्तीचा चारा तयार झाल्यास वाया जातो. याकरिता अंदाजापेक्षा जादा उत्पादन ध्यानात घेऊन नियोजन करावे. कमी पडणाऱ्या चाऱ्याची पूर्तता करण्यासाठी चाऱ्याचा राखीव साठा करावा. उदा. वाळलेला चारा साठवून किंवा मुरघास करून, कारण गरजेनुसार हा चारा लगेच वापरता येतो. अशा प्रकारचा गवताचा साठा दुष्काळी प्रदेशासाठी वरदान आहे. कारण जिरायती शेतीमुळे चारापुरवठ्यामध्ये कमी-जास्तपणा होतो.

**जनावरांच्या चाऱ्याची गरज -**

1) एका प्रौढ जनावरास त्याच्या वजनाच्या 10 टक्के इतका हिरवा चारा लागतो. उदा. 400 किलो वजन असणाऱ्या गाईस 40 किलो हिरवा चारा देणे आवश्यक आहे. यापैकी एकदल हिरवा चारा 30 किलो आणि द्विदल हिरवा चारा 10 किलो द्यावा.
2) एका जनावरास वर्षभरात मिळून दिवस 365 x 40 किलो = 14,600 किलो म्हणजेच 15 टन हिरव्या चाऱ्याची गरज असते.
3) एका एकरातून वर्षभरात 45 ते 50 टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते म्हणजेच एका एकरातून तयार होणाऱ्या हिरव्या चाऱ्यावर तीन प्रौढ जनावरे व्यवस्थित पोसली जातील. या जनावरांना एकदल आणि द्विदल असा समतोल चारा मिळण्यासाठी खालीलप्रमाणे नियोजन केल्यास जनावरांना वर्षभर हिरवा चारा, वर्षभर ओलिताची सोय असल्यास उपलब्ध होईल.

**वर्षभरामध्ये एक एकर क्षेत्रावर चारा पिकाचे नियोजन - (मॉडेल क्र - 1)**

1) दहा गुंठे क्षेत्रावर लसूण घासाची लागवड करावी. यापासून वर्षभरात 10 ते 12.5 टन हिरवा द्विदल चारा उपलब्ध होईल. हा चारा तीन जनावरांना दरडोई दरदिवशी 10 किलो प्रमाणे उपलब्ध होईल.
2) दहा गुंठे क्षेत्रावर संकरित नेपियरची लागवड करावी. यापासून दर वर्षी 10 ते 12 टन हिरवा चारा उपलब्ध होतो. हा चारा तीन जनावरांना दरडोई दरदिवशी 10 किलो याप्रमाणे उपलब्ध होईल. संकरित नेपियरची लागवड पट्टा पद्धतीने करावी. त्यामध्ये हिवाळ्यात बरसीमचे आंतरपीक घेतल्यास थंडीमुळे हिवाळ्यात नेपियरच्या उत्पादनात येणारी घट बरसीमच्या उत्पादनामुळे भरून निघेल.
3) वीस गुंठे क्षेत्रावर खरीप हंगामात गोड ज्वारीची लागवड केल्यास आठ टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळेल. रब्बी हंगामात मका पिकाच्या आफ्रिकन टॉल जातीची लागवड केल्यास 10 ते 12 टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळेल. उन्हाळी हंगामात परत गोड ज्वारीची लागवड केल्यास सात टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळेल.
4) अशा तऱ्हेने तीनही पिकांपासून एकरी वार्षिक 25 ते 27 टनांपर्यंत हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळेल. जे तीन जनावरांसाठी प्रतिदिनी 75 किलोप्रमाणे 365 दिवसांसाठी 27.5 टन इतके पुरेसे होईल.
5) लसूणघास प्रतिदिन प्रति जनावर 10 किलो, नेपियर चारा प्रति जनावर प्रतिदिन 10 किलो आणि मका किंवा ज्वारी प्रतिदिन प्रति जनावर 25 किलो अशा पद्धतीने प्रतिदिन प्रति जनावर 45 किलो चारा मिळेल.

**चारा पीक लागवड आणि उत्पादन** -
1) 10 गुंठे - लसूण घासापासून वर्षभरातील हिरवा चारा उत्पादन - 10 टन ते 12.5 टन
2) 10 गुंठे - संकरित नेपियरपासून वर्षभरातील हिरवा चारा उत्पादन - 10 टन ते 12.5 टन
3) 20 गुंठे - खरीप हंगामातील कडवळ पिकापासून हिरवा चारा उत्पादन - 6 टन
4) 20 गुंठे - रब्बी हंगामातील मका पिकापासून हिरवा चारा उत्पादन - 10 टन
5) 20 गुंठे - उन्हाळी हंगामातील कडवळ पिकापासून हिरवा चारा उत्पादन - 7 टन
एकूण - 43 ते 50 टन

याप्रमाणे एक एकर क्षेत्रातून वर्षभरात मिळून 45 ते 50 टन चारा उत्पादन होईल, की जो तीन प्रौढ जनावरांसाठी पुरेसा असेल. त्या जनावरांपासून मिळणारे शेणखत चारा पिकाच्या उत्पादनासाठी वापरल्यास जमिनीची सुपिकता व उत्पादकता टिकून राहाते. तीन वर्षांनंतर लसूणघास आणि संकरित नेपियर या पिकांच्या लागवड क्षेत्राची अदलाबदली करावी म्हणजे लसूणघासाने जमिनीत साठविलेल्या


Phone: 02557 221710 krushi.dindoripranit.org

नत्राचा फायदा संकरित नेपियर पिकास होऊन उत्पादन वाढण्यास मदत होईल.

**वर्षभरामध्ये एक एकर क्षेत्रावर चारा पिकाचे नियोजन - (मॉडेल क्र - 2)**

1) 10 गुंठे क्षेत्रावर लसूण घासाची लागवड करावी.
2) 10 गुंठे क्षेत्रावर संकरित नेपियरची लागवड करावी.
3) 20 गुंठे क्षेत्रावर खरीप हंगामात कडवळाची (गोड ज्वारी) लागवड करावी. कडवळापासून हिरवा चारा मिळेल.
4) त्याच 20 गुंठे क्षेत्रावर रब्बी हंगामात मालदांडी ज्वारीची लागवड करावी. ज्वारीच्या धान्याचे उत्पादन घ्यावे म्हणजे आपोआपच कडब्याचे उत्पादन मिळेल. हा कडबा वाळलेला चारा म्हणून वापरता येतो.ज्वारीच्या धान्याचा भरडा करून आंबवण म्हणून वापर करावा.
5) उन्हाळी हंगामात जायंट बाजरी चाऱ्याचे पीक म्हणून पेरावी. बाजरीपासून हिरवा चारा मिळेल.

**तीन जनावरांसाठी चाऱ्याचे वर्षभराचे उत्पादन -**

हिरवा एकदल चारा -
1) संकरित नेपियरपासून हिरवा चारा - 12 टन
2) कडवळापासून हिरवा चारा - 6 टन
3) बाजरीपासून हिरवा चारा - 5 टन
4) लसूण घासापासून हिरवा चारा - 11 टन
5) ज्वारीपासून कडबा - 2200 किलो
6) ज्वारीपासून ज्वारीचे धान्य - 550 किलो

**II वन औषधी व्दारे जनावरांवर उपचार II**

**१. सर्व पाचन समस्यासाठी वनौषधी तयार करण्याची पध्दत**

**आवश्यक साहित्य ५ दुधाळू जनावरांसाठी किवा १० मेंढ्या किंवा १० बकऱ्यांसाठी :-**

**साहित्यसामग्री :-**

काळे मिरे १० ग्रॅम, जिरे १० ग्रॅम, धने २० ग्रॅम, मेथी २० ग्रॅम, ओवा १० ग्रॅम, अद्रक २० ग्रॅम , हळद ताजी ५० ग्रॅम, कोरफड १०० ग्रॅम, गुळवेल पाने १०० ग्रॅम, लसूण ५० ग्रॅम, लाल मिरच्या / हिरव्या मिरच्या - 50 ग्रॅम, विड्याचे पाने १०, कढीपत्ता पाने - 100 ग्रॅम, तुळस पाने ५० ग्रॅम, तरवार झाडाची पाने १०० ग्रॅम , नारळ १०० ग्रॅम, गुळ १०० ग्रॅम, सेंधव मीठ ५० ग्रॅम.

**बनविण्याची पद्धती-**

एका मिक्सर मध्ये सर्व कोरडे पदार्थ ( मिरपूड, जिरे , धणे , मेथी, ओवा , लाल मिरच्या ) प्रथम दळणे
नंतर सर्व ताज्या वनस्पती वाटून घेणे उदा. कोरफड , कढीपत्ता पाने, लसूण , तुळशी, आले , हळद, नारळ ( किसलेले ), गुळवेल पाने आणि तरवार बारीक कराव्या. वरील दोन्ही मिश्रण एकत्र केल्यानंतर गुळाचे बारीक खडे व सेंधव मीठ टाकून सर्व मिश्रण चांगले मिसळून घ्यावे.

**मात्रा-**

वरील सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १०० ग्रॅम मिश्रणाचे (निंबाच्या आकाराचे) गोळे करून चारावे. महिन्यातून एकदा उपाशीपोटी देवू शकता. लहान जनावरांसाठी ( नव वासरे, मेंढ्या किंवा बकऱ्या ) अर्धी मात्रा द्यावी.

वरील औषधी हि पाचन समस्येवर, प्रजनन/प्रजोत्पादन समस्या, जंत आणि तोंडखुरी,पायखुरी, जीभ निळी होणे, ताप, स्तनदाह रक्तदोष यासारख्या आजारावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून फायद्याचे आहे.

**२. पोटांच्या आजारासाठी**

- १०० मी.ली. एरंडी तेल आणि कोमट पाणी घेऊन ते त्याच्या गुठळ्या होईपर्यंत हलवत राहावे व ४ ते ६ तासानंतर तोंडाद्वारे द्यावे
- विड्याचे 10 पाने , आले 20 ग्रॅम , मिरपूड 10 ग्रॅम , लसूण 10 ग्रॅम, सेंधव मीठ 50 ग्रॅम घेऊन ते बारीक करावे व कोमट पाण्यात मिसळून ६-६ तासानंतर तोंडाद्वारे द्यावे.


Phone: 02557 221710 krushi.dindoripranit.org

**३. अतिसारा साठी:**

एक मुठ कोवळी डाळिंबाचे पाने, कोवळी कडुनिंबाच्या पाने, कोवळी पेरूची (जांब) पाने, ५० ग्रॅम सुंठ, १०० ग्रॅम गुळ घेऊन बारीक मिश्रण करावे व त्याचे ३ भाग करावे. एकावेळी एक भाग गोळा बनवून द्यावा जोपर्यंत अतिसार (हगवण) कमी होत नाही तोपर्यंत कमीतकमी ३ वेळा द्यावे.

**४. जनावरांमधील अतंर्गत परोपजीवी जंतूचे निराकरण करण्यासाठी ( जंतनाशक वनौषधी )**

प्रत्येकी १ किलो निरगुडी , कोरफड, निंबोळी, भुईनिंब (काडे चिराईत), रुईची पाने व थोडेसे पाणी टाकून एकत्र बारीक करावे. ते गाळून ४ लिटर द्रावण तयार करावे व तीन दिवस ठेवावे.

मात्रा:-

- वाढ झालेल्या बकरी किंवा मेंढीला ३० मी.ली. द्रावण पाजावे.
- तीन महिन्यापेक्षा कमी वयाच्या बकरी किंवा मेंढीला १० मी.ली. द्रावण पाजावे.
- मोठ्या जनावरांना १०० मी.ली. द्रावण पाजावे.

हे जंत नाशक द्रावण अतिसार कमी करते त्यामुळे शेणाचा घाणेरडा वास येत नाही व पातळ शेण येणे बंद होते यामुळे मेंढी व शेळीची चारा खाण्याची क्षमता वाढते व जनावर निरोगी राहते.

**५. उवा, गोचीड, गोमाशी यासारख्या रक्तशोषक परोपजीवी जंतू नष्ट करण्यासाठी**

- एरंडेल तेल किंवा निंबोळी तेल, खडे मीठ आणि थोडासा कापूर एकत्र करावे आणि जंतू असलेल्या भागावर लावावे.
- उलटा रावण (टनटनी) चे पूर्ण झाड घ्यावे व ठेचून त्याला जनावराच्या लघवीमध्ये मिसळून बाहेरून लावावे
- 250 ग्रॅम तंबाखू 2 लिटर पाण्यामध्ये उकळावा व ते द्रावण ५ लिटर पाण्यात मिसळून १० ते २० जनावरांच्या शरीरावर शिंपडावे.

**६. श्वसन नलीकेचे आजार**

तुळशीची पाने १०० ग्रॅम, अडूळसाची पाने 100 ग्रॅम , आले 50 ग्रॅम , मिरपूड 10 ग्रॅम , गूळ 100 ग्रॅम एकत्र करून १ लिटर पाण्यात उकळून काढा करावा.

- जनावरांना दिवसातून दोन ते तीन वेळा १०० ते २५० मी.ली. काढा देणे.

**७. पायखुरी व तोंडखुरी आजार**

**आवश्यक साहित्य:**

हळद 200 ग्रॅम ( नुकतेच काढलेले हळदीचे ओले कंद), एका नारळाचे दुध ( 1 नारळ किसून त्याच्या पाण्यासाहित), कोरफड 200 ग्रॅम , ताड गूळ 200 ग्रॅम, खडे मीठ 100 ग्रॅम , लसूण 100 ग्रॅम , मिरपूड 50 ग्रॅम, जिरे 50 ग्रॅम , मेथी 50 ग्रॅम एकत्र करावे. हे मिश्रण जनावराला देण्यापूर्वी त्यांना ५० ग्रॅम तीळाच्या तेलात भिजविलेली २ केळी खाऊ घालावी.

वरील साहित्य उदा. हळद, कोरफड, लसूण, किसलेले खोबरे पुरेसे पाणी वापरून खलबत्त्यात बारीक कुटावे एका भांड्यात घ्यावे तसेच काळे मिरे जिरे मेथी एकत्र कुटून बारीक करावे आणि एक लिटर पाण्यात वरील सर्व मिश्रण एकत्र मिसळावे ते मिश्रण गाळून बकरी मेंढीला १०० मी.ली. व लहान पिल्लांना ५० मी.ली. पाजावे.

**खुर व पायातील जखमा**

खुरातील विशेष जखमेच्या उपचारासाठी खालील घटकांचा वापर करून औषध तयार केले जाऊ शकते.

तीळ तेल - 1 लिटर , हळद 100 ग्रॅम, लसूण 50 ग्रॅम, मेहंदीची पाने १० ग्रॅम, कडुनिंबाची पाने 10 ग्रॅम , (खुप्पी)- खोकलीची पाने १० ग्रॅम हे सर्व पाने एकत्र करून कुटून घ्यावी व एक लिटर तिळाच्या तेलात चांगले उकळून थंड झाल्यावर हे तेल गाळून बाटलीत भरून ठेवा.

या तेलाचा वापर जनावराच्या पायावर जखमा असलेल्या ठिकाणी सतत तीन दिवस किंवा जखम बरी होईपर्यंत लावा.

तसेच प्रत्येकी १०० ते २०० ग्रॅम नाचणी, ज्वारी व बाजरीचे पीठ एकत्र घेऊन त्याची पेज तयार करावी. जनावरांना हि पेज पाजण्यापूर्वी ५० ग्रॅम तिळाच्या तेलात भिजविलेली दोन केळी खाऊ घालावी.



Phone: 02557 221710 krushi.dindoripranit.org

**८. दुधाळू जनावरांच्या स्तनदाह आजारावरील उपचार**

**आवश्यक साहित्य**

1. कोरफड 2 किंवा 3 पाने
2. हळद - 50 ग्रॅम
3. चुना - 10 ग्रॅम

वरील सर्व साहित्य एकत्र कुटून पेस्ट तयार करा व हि पेस्ट जनावरांच्या दुखऱ्या कासेवर दिवसातून तीन वेळा ३ ते ७ दिवस लावावी. हि पेस्ट लावण्यापूर्वी जनावरांची कास गरम पाण्याने दिवसातून ३ वेळा पूर्णपणे धुवावी. ५० ग्रॅम खायचा सोडा, ४ लिंबूचा रस २०० मी.ली. पाण्यात मिसळून जनावरांना पाजावे.

**९. जनावरांच्या वंध्यत्व निवारणासाठी उपचार**

वारंवार प्रजनन किंवा जनावर उलटून येणे व वंध्यत्व यासाठी खालील प्रमाणे उपचार करावे.

- कोरफडीची १ किंवा 2 पाने उपाशी पोटी जनावरांना ३ दिवस खायला द्यावे.
- २०० ग्रॅम मोड आलेले हरभरे किंवा बाजरी किंवा ज्वारी रोज याप्रमाणे १५ दिवस खायला द्यावे.

जनावरात माजावर येण्याची लक्षणे दिसताच १०० ते १५० मी.ली. निंबोळी तेल पाजावे त्यानंतरच कृत्रिम रेतनासाठी किवा नैसर्गिक रेतनासाठी घेऊन जावे.

**११. जनावरांच्या उत्तम आरोग्यासाठी पंचगव्य**

एक किलो देशी गायीचे शेण, एक लिटर देशी गायीचे दुध, एक लिटर देशी गायीचे दही, एक लिटर देशी गायीचे गोमुत्र व १०० ग्रॅम देशी गायीचे तूप हे सर्व एकत्र करा यासोबतच त्याच्यामध्ये दोन केळी व एक लिटर उसाचा रस टाका व एक आठवडा ठेवा.

**मात्रा:-** मोठ्या जनावरांसाठी २०० ते ३०० मी.ली. पंचगव्य महिन्यातून एकदा पाजा.

बकरी किंवा मेंढीसाठी १०० मी.ली. पंचगव्य महिन्यातून एकदा द्यावे.

त्वचारोग ( शरीरातून द्रव्यपदार्थ गळत असलेला ) झालेल्या कुत्र्यासांठी १०० मी.ली. पंचगव्य तीन दिवस सतत पोटात द्यावे.

## ॥ गोठ्याचे व्यवस्थापन व रचना ॥

**1) गोठ्याची स्वच्छता:**

गोठा स्वच्छ असला पाहिजे. खेळती हवा व भरपूर सूर्यप्रकाश येईल अशी गोठ्याची रचना असावी. दूध काढण्याची जागा स्वच्छ असावी. दूध काढताना जमिनीवर कुठलाही कचरा अगर शेण असू नये. गोठा निर्जंतुक पाण्याने स्वच्छ धुवावा, त्यामुळे धूळ उडणार नाही. जमिनीपासून चार-पाच फुटांपर्यंत चुना लावावा, त्यामुळे गोठा जंतूविरहित राहतो; तसेच गोमूत्र व पाणी निचरा होईल अशी गोठ्याची रचना असावी. गोठ्याबरोबर शोषखड्डा करून त्यात मलमूत्र साठवावे, त्यामुळे डास होणार नाहीत

**2) जनावरांची स्वच्छताः**

दुधाची धार काढण्यापूर्वी कास पाण्याने स्वच्छ धुवावे. त्यानंतर शिफारशीत जंतुनाशकाच्या द्रावणाने कास व कासेजवळील भाग, सड स्वच्छ धुवावेत. कोरड्या फडक्याने कास पुसून घ्यावी. जेणेकरून कास व कासेच्या भागातील बारीक केस, धूळ दुधात पडणार नाही.

**3) दोहन करणाऱ्या व्यक्तीची स्वच्छताः**

दूध काढणारी व्यक्ती स्वच्छ व निरोगी असणे आवश्यक आहे. त्याची नखे वाढलेली नसावीत, त्याचे कपडे स्वच्छ असावेत. दूध काढण्यापूर्वी त्या व्यक्तीने साबणाने हात स्वच्छ धुवावेत. धार काढताना शिंकणे, थुंकणे, खोकणे, तंबाखू खाणे इत्यादी गोष्टी वर्ज्य कराव्यात. आजारी किंवा जखमा असलेल्या जनावरांचे दूध वेगळ्या भांड्यात अगर शेवटी काढावे.

**4) दुधाच्या भांड्याची स्वच्छता:**

दूध खराब होण्याचे किंवा प्रत खालावण्याचे प्रमुख कारण म्हणजे भांड्यांमुळे रोगजंतूंची मोठ्या प्रमाणावर वाढ होते. हे टाळण्यासाठी भांडी प्रथम थंड पाण्याने धुऊन घ्यावी. नंतर गरम पाण्याने धुवावीत. धार काढण्याच्या बादल्या, किटल्या, चरव्या, कॅन यांना कमीत कमी कोपरे असावेत.

**5) दूध काढण्याची पद्धती:**

सर्वसाधारणपणे सडाच्या भोवती चार बोटे लावून अंगठा दुमडून दूध काढतात, त्यामुळे सडांना इजा होण्याची, कासदाह होण्याची शक्यता अधिक असते. याउलट पूर्ण हाताचा वापर ही सर्वांत योग्य व चांगली पद्धत आहे. यामध्ये अंगठा न दुमडता पाचही बोटांत (मुठीत) सड पकडून धारा काढल्या जातात.

**6) दूध काढल्यानंतर घ्यावयाची काळजी:**

दूध काढल्यानंतर स्वच्छ गाळणीने गाळून घ्यावे, यामुळे दुधातील घाण, कचरा वेगळा होतो व प्रत राखण्यास मदत होते. दूध उन्हाळ्यात बर्फात व हिवाळ्यात थंड पाण्यात साठवून लवकरात लवकर संकलन व शीतकेंद्रात पाठवावे,

❖ **काही महत्वपूर्ण बाबी :**

- **दर शनिवारी नियमित गायीला गुळ खाऊ घालावा.**
- **आठवड्यातून किमान एकदा मऊ ब्रशने गायीला खरारा करावा.**
- **गायींच्या गळ्यात केसारी व मंजुळ नाद करणारी लहान घंटी अवश्य बांधावी.**
- **गोठ्यात गायींसोबत असणारा बासरीधारी श्रीकृष्णाचा अथवा श्री दत्त महाराजांचा फोटो लावावा व दररोज सायंकाळी त्याठिकाणी एक तुपाचा दिवा लावावा.**
- **गोठ्याला संरक्षणासाठी गोरक्षचिंच, असोला नारळ कपड्यात बांधून टांगावा (दर अमावस्येला बदलणे)**
- **जनावरांचे तोंड शक्यतो उत्तरेकडे अथवा पूर्वेकडे असावे.**
- **गोठयात बासरीची धून अथवा सुमधुर संगीत दुध काढण्याच्या तसेच चारा खाण्याच्या वेळेस वाजवावी जेणेकरून गायींचा ताण तणाव नाहीसा होण्यास मदत होईल.**
- **गाईच्या गोठयात श्री स्वामी समर्थ जप युनिट चालू ठेवल्यास खूप चांगले असे परिणाम दिसून येतात.**
- **सूर्यास्तानंतर जनावरांकडून शेतीचे कामे करवून घेऊ नये.**
- **बैल पोळ्याच्या दिवशी बैलाच्या पाठीवर रुईच्या चिकाचा ठिपका द्यावा.**
- **दिपावलीच्या सुरुवातीला म्हणजे “वसूबारस” गाय वासराची यथासांग पूजा करावी.**

❖ **काही आध्यात्मिक सेवा :**

- **गोसामुदय रक्षक मंत्र:**

  **ॐ नमो भगवते त्र्यंबकाय पशमयोपशमय । चुलू चुलू मिलि मिलि भिदि भिदि गोमानिनि चक्रिणी हुं फट् ॥**

  वरील मंत्र कन्हेरच्या लेखणीने लिहून गोशाळेच्या चारही कोपऱ्यात टांगणे.
- **गाय आजारी अथवा अस्वस्थ असल्यास :**

  गायीच्या पोटावर अष्टगंधाने आरोग्य यंत्र (१६५६) लिहावे तसेच गायीच्या कानात नित्यसेवा ग्रंथातील श्री कालभैरवाष्टक स्तोत्र, नवनाथांचा मंत्र, शाबरी मंत्र, वल्गा सुक्त इ सेवा करावी.

❖ **अधिक माहितीसाठी प्रधान केंद्र दिंडोरी येथे संपर्क करावा.**



Phone: 02557 221710 krushi.dindoripranit.org